# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर  **P.S.(ठाणे):** शाहुपूरी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0033  **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/01/2025 09:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 06/01/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/01/2025
   **Time From (वेळेपासून):** 13:41 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:45 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 12/01/2025  **Time (वेळ):** 08:51 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 021
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/01/2025 08:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 3 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** कोल्हापुर स्टेशन रोडलगत रुईकर, कलनीमधील बँक ऑफ बडोदा समोरील,रस्त्यावर जि कोल्हापुर
   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** हनुमंत वसंतराव जाधव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1970

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्रभारी शाखा व्यवस्थापक एसटी,कोऑपबँक लि मुंबई रा रुमनं15, ,बारामती ता बारामती जि पुणे,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्रभारी शाखा व्यवस्थापक एसटी,कोऑपबँक लि मुंबई रा रुमनं15, ,बारामती ता बारामती जि पुणे,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7385298998

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल रमेश पुजारी | | | 1. एस क ऑप बँक लि कोल्हापुर रा,प्लट क्र04, ऋ षिकेश पार्क, प, पाचगाव, ताकरवीर जि कोल्हापु,शाहुपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 12/01/2025

मी हनुमंत वसंतराव जाधव वय 55 वर्षे व्यवसाय- नोकरी पद- प्रभारी शाखा व्यवस्थापक एस.टी.को.ऑप. बँक लि. मुंबई रा. रुम नं 15, बी/2 ग्रिन पार्क, रुई बारामती ता. बारामती जि. पुणे. मोबा.क्र. 7385298998, 9766895896 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 03/01/2025 रोजी पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे श्री गावडे यांना भेटून माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगितले की, मी सध्या एस टी को ऑप. बँक लिमिटेड मुंबई सेंट्रल येथे प्रभारी शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहे. त्यापुर्वी मी दि.07/07/2021 ते दि. 16/09/2023 रोजी दरम्यान पंढरपुर शाखेत लिपिक या पदावर कार्यरत होतो. त्या दरम्यान मी दि. 07/10/2022 रोजी मध्यम मुदतीचे कर्ज रक्कम रु. 12,00,000/- (बारा लाख रुपये) मंजुर करून त्याची परतफेड 130 हफ्त्यांची होती. कर्ज घेतल्यानंतर कर्जाची परतफेड आवश्यक असताना मी जुलै 2023 ते जानेवारी 2024 असे 07 महिने कर्जाचे व व्याजाचे हफ्त्यांची परतफेड केली नाही. तसेच पंढरपुर शाखेत लिपीक या पदावर कार्यरत असताना माहे जुलै 2022 ते जुन 2023 या कालावधीमध्ये एकुण 185 दिवस कामावर गैरहजर राहून लॉगीन आयडीमध्ये एकही दिवस काम केलेले दिसून येत नाही व गैरहजेरीच्या कालावधीत हजेरी पत्रकावर सही केल्याने आणि गैरहजर कालावधीमध्ये वेतन पुर्ण घेवून बँकेस आर्थिक हानी पोहचवल्याच्या कारणावरून आमचे महाव्यवस्थापक (मॅनेजिंग डायरेक्टर) एस टी को ऑप.बँक लिं. मुंबई यांनी माझे चौकशीकामी श्री. राहुल रमेश पुजारी, बँक निरीक्षक, एस टी को.ऑप.बँक लिं.कोल्हापुर शाखा यांची नेमणुक केली आहे. दि. 18/10/2024 रोजी मला बँक निरीक्षक श्री राहुल पुजारी साहेबांनी एस टी बँक शाखा बारामती येथील शाखेत चौकशीकामी बोलावून माझेवरती ठेवलेल्या आरोपांबाबत चौकशी केली असता त्यांनी विचारलेप्रमाणे मी त्यांचे प्रश्नांची उत्तरे दिली. त्यानंतर रात्री उशिरा आम्ही जेवणाकरता वृदांवन हॉटेल बारामती येथे गेलो. जेवणानंतर श्री राहुल पुजारी यांनी मला हॉटेलच्या बाहेर एका बाजुला घेवून माझे ज्युनिअर ऑफिसर पदाचे पे फिक्सेशन, जुलै 2023 ची वार्षिक वेतनवाढ, 75 दिवस रजा, माझे विरोधातील चौकशीमध्ये मला मदत करणेसाठी तसेच निलंबन कालावधीतुन मला कामावर हजर करून घेण्याकरीता माझेकडे रु. 2,00,000/- (दोन लाख रुपये) मागणी करून तडजोडी अंती रु.1,50,000/- व रु.10,000/- इतर जेवण व इतर खर्च असे एकुण रु.1,60,000/-(एक लाख साठ हजार) पैशाची मागणी केली. त्यावेळी मी नाईलाजास्तव त्यांना हो असे सांगितले. त्यानंतर त्यांनी दि. 04/11/2024 पर्यंत माझे चौकशीचा अहवाल आमच्या बँकेचे मुख्य कचेरी मुंबई येथे न पाठवल्याने मी श्री पुजारी साहेबांची कोल्हापुर येथे जावून भेट घेतली. त्यावेळी त्यांनी सांगितलेले पैसे दिल्याशिवाय काहीही काम होणार नाही असे सांगुन माझेकडे सदर रकमेपैकी रु.50,000/- (पन्नास हजार रुपये) पैशाची मागणी केली. माझा नाईलाज झाल्याने सदर रक्कम मी त्यांना दिली असता उर्वरित रक्कम रु. 1,10,000/- (एक लाख दहा हजार रुपये ) काम झाल्यावर दया असे श्री पुजारी साहेबांनी मला सांगितले. त्यानंतर माझ्या विरुध्दचे चौकशीचा अहवाल श्री पुजारी साहेबांनी आमचे बँकेची मुख्य कचेरी मुंबई सेंट्रल येथे पाठविला व दि. 02/12/2024 रोजीचे आदेशान्वये दि. 30/11/2024 रोजी पासून आमचे बँकेच्या मुंबई सेंट्रल येथील शाखेत माझी प्रभारी शाखा व्यवस्थापक नियुक्ती झाली. माझ्या विरुध्दच्या चौकशी अहवालासंदर्भान्वये मी पुजारी साहेबांना माझे शिक्षेबाबत काय झाले व मला चौकशीची कागदपत्रे मिळावे अशी विनंती केली असता पैसे पुर्ण दिल्यानंतर सांगतो असे बोलून तेंव्हापासून ते आज पर्यंत श्री राहुल पुजारी साहेब हे माझेसाठी केलेल्या वरिल कामाचा मोबदला म्हणून माझेकडे उर्वरित रक्कम 1,10,000/- (एक लाख दहा हजार रुपये) रुपयेची समक्ष भेटून

व त्यांचे मोबा.क्र.9403800628 वरून माझे मोबा.क्र.7385298998 वर फोन करून मागणी करीत आहेत. ते मागणी करीत असलेली सदर रक्कम ही कोणतीही शासकीय फी नसून लाच रक्कम असलेबाबत माझी खात्री झाली आहे तरी श्री. राहुल पुजारी यांचे विरुध्द आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई होणेबाबत तक्रार सांगितली होती. त्यावेळी गावडे साहेबांनी पोलीस निरीक्षक पवार यांना बोलावुन घेवुन ते पुढील कारवाई करतील असे सांगितले. त्यावेळी मी पवार साहेबांना माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यावेळी पवार साहेबांनी लागलीच दोन पंच बोलावुन घेतले त्याप्रमाणे पंच आलेनंतर मी पंचासमक्ष माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगितली त्यानंतर मी माझा लेखी तक्रारी अर्ज पवार साहेबांचेकडे लिहुन दिला. त्यावेळी मी राहुल पुजारी हे दिनांक 06/01/2025 रोजी कोल्हापुर वरून मुंबईला जाणार असून त्या दरम्यान ते पुणे येथे माझी भेट घेणेकामी उतरणार असल्याने त्यावेळी मी त्यांना भेटणार आहे असे सांगितले त्यावेळी पवार साहेबांनी पुढील कारवाई दिनांक 06/01/2025 रोजी करणेची असलेबाबत सांगितले.

दिनांक 06/01/2025 रोजी मी सकाळी 11.15 वा. पवार साहेबांना भेटलो. त्यावेळी तेथे पंच व त्यांचा स्टाफ उपस्थित होता. त्यावेळी पवार साहेबांनी मला लोकसेवक श्री पुजारी हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे याबाबतची पडताळणी करणार असल्याचे सांगितले. त्यावेळी मी पवार साहेबांना पुजारी साहेब हे सांगली येथे काम असल्याने त्यांचे मुंबईला जाणे रद्द झाले आहे तसेच मला उपचारकामी बारामती येथे जावयाचे असल्याचे सांगितले. त्यावेळी मी पुजारी साहेब यांनी माझेकडे मागणी केलेल्या लाच रक्कमेबाबतची पडताळणी फोनवरून करा असे मी पवार साहेब यांना सांगितले. त्यावेळी पवार साहेबांनी लोकसेवक श्री पुजारी यांचे मोबा.क्र. 9403800628 वर फोन करून ते माझेकडे लाचेची मागणी करतात आहे अगर कसे? याबाबतची पडताळणी करणार असल्याचे सांगितले. त्यावेळी मी पवार साहेब यांचे सुचनेवरून मी माझेवरील मोबाईल क्रमांकवरून पुजारी साहेब यांचे मोबा.क्र. 7385298998 वरती फोन केला त्यावेळी पुजारी साहेबांनी फोन उचलला त्यावेळी मी नमस्ते पुजारी साहेब असे बोललो त्यावेळी पुजारी साहेब नमस्कार झाल का? अशी लाच रकमेबाबत माझेकडे विचारणा केली. त्यावेळी मी दोन-तीन दिवसांची सवलत मिळावी थोडीशी अडचण आहे असे बोललो. त्यावेळी पुजारी "काय किती झालय सांगा ते अमाउंट" असे विचारले त्यावेळी मी "आता साहेब तुम्हाला दयायचेत किती मला" असे विचारले. त्यावेळी पुजारी यांनी "सांगितले की, वन टेन" असे बोलेले. त्यावेळी मी "त्याच्यातच काही तरी रक्कम तडजोड करावी साहेब" असे बोललो. त्यावर पुजारी "किती आत झालय ते सांगा मला पहिल" असे बोलेले. त्यावेळी मी पुजारी यांना "पहिल तुम्हाला ते पन्नास दिल्यात साहेब" असे बोललो. त्यावेळी पुजारी "आता किती काळ होता सांगाबर"असे बोलले. त्यानंतर मी पैसे गोळा करणेकरीता आणखी वेळ मिळण्याबाबत पुजारी साहेब यांना सांगितले. लोकसेवक पुजारी यांनी "मी संजुला पाठवतो संध्याकाळी बोलतो तुमच्याबरोबर असे बोलून फोन कट केला. सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरद्वारे पवार साहेबांनी ध्वनिमुद्रीत केला. एंकदरीत पुजारी साहेब यांनी माझे विरुध्द असलेल्या चौकशीमध्ये केलेल्या कामाचा मोबदला म्हणून यापुर्वी रु.50,000/- स्वीकारल्याचे मान्य करून उर्वरित रक्कम रु.1,10,000/-लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावेळी पवार साहेब यांनी मला दोन्ही पंचांसमक्ष पुढील पडताळणी इसम नामे संजु यांचेकडे करावी लागेल असे सांगितले त्यावेळी त्यांना माझी पुजारी साहेब यांचे विरुध्द तक्रार असून इसम नामे संजय यांचेकडे पडताळणीकरीता जाण्याची माझी इच्छा नसल्याचे त्यांना सांगितले. तरी पुढील कारवाई पुजारी साहेब यांचेविरुध्द करावी असे बोललो. तसेच ते शाखाप्रमुख असल्याने त्यांना उदया दि.07/01/2025 रोजी मुंबई सेंट्रल येथील त्यांचे बँकेच्या शाखेत कर्तव्यावर हजर व्हावे लागेल त्यामुळे शुक्रवार नंतर पुढील कारवाईचे नियोजन कराव असे सांगितल्याने पवार साहेबांनी चालु कारवाई तापुरती स्थगित केली. तसेच शनिवार दि. 11/01/2025 रोजी सकाळी 09.30 वा ला.प्र.वि.पुणे कार्यालय येथे उपस्थित राहण्याच्या सुचना आम्हाला दिल्या.

त्याप्रमाणे दि.11/01/2024 रोजी सकाळी 10.30 वा. मी पुणे कार्यालयात उपस्थित राहीलो त्यावेळीघ् त◌ेथे पवार साहेब त्यांचा स्टाफ व पंच हजर होते. त्यावेळी पवार साहेब यांनी मला पुढील सापळा कारवाईबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, पुजारी साहेब यांनी मला लाचेची रक्कम कोल्हापुर येथे आज रोजी घेवून येणेबाबत कळविले आहे. त्याप्रमाणे पुढील सापळा कारवाईचे नियोजन करावे असे मी पवार साहेब यांना सांगितले. त्यावेळी त्यांनी मला सापळा कारवाईचे नियोजन कोल्हापूर येथे जावुन कण्याचे आहे असे सांगिते त्यानंतर काहीवेळाने आम्ही पुणे येथुन निघुन पुणे - कोल्हापुर महामार्गाने कोल्हापुरमध्ये रुईकर कॉलनी चौक येथे 16.25 वा पोहचलो.

त्यानंतर पवार साहेब यांनी सापळा कारवाई सुरू केली. त्यावेळी मी लाच रक्कम म्हणुन माझेकडीलरु. 70,000/- व पवार साहेब यांनी त्यांचेकडील चिल्ड्रेन बँक ऑफ इंडिया रु.500/- लिहलेल्या डमी 80 नोटा असे एकुण रु.1,10,000/- लाच रक्कम पुजारी यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांना देणेसाठी तयार केली. त्यावेळी पवार साहेबांनी मला व पंचाना अ◌ॅथ्रासिंन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. व अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात

निळसर चकाकी दिसलेबाबत खात्री करू इतर सुचना दिल्या सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासि लावलेले 1,10,000/- रूपये माझे पॅन्टचे उजव्या बाजूस असलेल्या खिशामध्ये ठेवुन मला सापळा कारवाईचे अनुषंगाने योग्य या सुचना दिल्या. पवार साहेब यांचेसुचनेवरून मी माझे मोबाईल क्र. 7385298998 वरून पुजारी साहेब यांचे मोबा.क्र. 9403800628 वर फोन लावला त्यावेळी पुजारी यांनी मला कुठे आहे अशी विचारणा केली त्यावेळी मी त्यांना हॉटेल महाराजा समोरील चौकामध्ये असल्याचे सांगितले. त्यावर पुजारी यांनी 15 मिनिटात सदर ठिकाणी आलो असे सांगुन फोन कट केला. सदरचा कॉल रेकॉर्ड केला. त्यावेळी मी पवार साहेबांना पुजारी साहेबांचे शरीरावर कोड असुन त्वचेवर पांढरे डाग आहेत असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझेकडे दिला. त्यानंतर मी व पंच क्रं.1 यांना रुईकर कॉलनी चौकाचे जवळ असलेल्या बँक ऑफ बडोदा बँकेचे बंद कार्यालयाचे समोर थांबलो. माझे पाठोपाठ पवार साहेब, सापळा पथक, पंच नं.2 श्री सोलंकी हे रुईकर कॉलनी चौकामध्ये हॉटेल महाराजा समोर रोडचे विरुध्द बाजूस कोणासही संशय येणार नाही असे सापळा लावुन थांबले.

काही वेळानंतर पुजारी साहेब मला तेथे येवुन भेटले त्यावेळी आमचेत माझे कामाचे अनुषंगाने बोलने झाले त्यावेळी पुजारी यांनी मला "तुमची काम तुम्हाला फक्त तुमची ऑर्डर राहिलेय" असे बोलले त्यावर मी "साहेब तुमच्या म्हणणेप्रमाणे पहिले पन्नास हजार रुपये दिलेले आणि हे राहिलेले तुम्हाला एक दहा दिले माझे काम" असे बोलले. त्यावर पुजारी "विषय क्लिअर हिशेब तुम्हाला तुमची ऑर्डर दिलेवर तुमचा विषय संपला बाकी भानगड नाय ना बस तसेच आता सुध्दा तुमची ऑर्डर आहे ना ते फक्त शेवटच राहिलल दयाचे. म्हणून तटवली, थांबवली होती आता हे दिल ना तुमच आता दोन चार दिवसात तुमचा विषय क्लीअर करुन टाकतो" असे बोलले. त्यानंतर मी "चालेल साहेब हे पैसे घ्या मोजून घेताय की कसय" असे बोलून माझे पॅन्टच्या उजव्या खिशातील लाच रक्कम बाहेर काढून ती उजव्या हाताने पुजारी यांचे समोर धरली असता पुजारी साहेब यांनी "दया की असू दया आहेत ना, बरोबर आहेत ना" असे बोलुन लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्वीकारून पॅन्टचे उजव्या बाजुचे खिशामध्ये ठेवली त्यावेळी मी "एक लाख दहा हजार रुपये मोजून आणलेत तुम्ही मोजून घ्या" असे म्हणालो त्यावेळी मी लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी पवार साहेब व त्याचा स्टाफ व पंच तेथे आले त्यांनी स्विकालेल्या रक्कमेसह पुजारी साहेब यांना पकडले. सदर ठिकाणी पवार साहेब यांनी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपास ण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही लाप्रवि कोल्हापुर कार्यालय येथे एक कक्ष उपलब्ध करून तेथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी मी एस टी को ऑप. बँक लिमिटेड मुंबई सेंट्रल पंढरपुर शाखेत लिपिक या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी तेथे मी घेतलेल्या मध्यम मुदतीचे कर्ज घेतले होते त्यातील 07 महिने कर्जाचे व व्याजाचे हफ्त्यांची परतफेड केली नाही. तसेच पंढरपुर शाखेत लिपीक या पदावर कार्यरत असताना एकुण 185 दिवस कामावर गैरहजर असताना गैरहजेरीच्या कालावधीत हजेरी पत्रकावर सही केल्याने आणि गैरहजर कालावधीमध्ये वेतन पुर्ण घेवून बँकेस आर्थिक हानी पोहचवल्याच्या कारणावरून बँकेने माझी चौकशी लावलेली होतीर◌ सदरची चौकशीकरीता श्री. राहुल रमेश पुजारी, बँक निरीक्षक, एस टी को.ऑप.बँक लिं.कोल्हापुर शाखा यांची नेमणुक केली होती. पुजारी यांनी चौकशी दरम्यान माझे ज्युनिअर ऑफिसर पदाचे पे फिक्सेशन, जुलै 2023 ची वार्षिक वेतनवाढ, 75 दिवस रजा, माझे विरोधातील चौकशीमध्ये मला मदत करणेसाठी तसेच निलंबन कालावधीतुन मला कामावर हजर करून घेण्याकरीता अप्रामाणीकणे माझेकडे दोन लाख रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअती 1,60,000/- रूपयांची मागणी करून पडताळणी कारवाई पुर्वी माझेकडुन बेकायदेशिरपणे 50,000/- रूपये स्विकारले त्यानंतर पुजारी यांनी चौकशीचा अहवाल पाठविला. त्यानंतर मी पुजारी यांना माझे शिक्षेबाबत काय झाले व मला चौकशीची कागदपत्रे मिळावत असे सांगितले असता पुजारी यांनी माझेकडे उर्वरित रक्कम रु.1,10,000/- (एक लाख दहा हजार रुपये ) रूपयांची पुन्हा अप्रामाणिकपणे मागणी केली त्याप्रमाणे मागणी केलेले पैसे 1,10,000/- (एक लाख दहा हजार रुपये ) बेकायदेशिरपणे माझेकडुन स्विकारताना त्यांना अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे कडील पथकाने रंगेहाथ पकडल्याने माझी श्री. राहुल रमेश पुजारी वय 43 वर्षे, व्यवसाय - नोकरी पद- बँक निरीक्षक नेमणुक- एस कॉ ऑप बँक लि. कोल्हापुर रा. प्लॉट क्र.04, ऋ षिकेश पार्क, पाचगाव, ता.करवीर जि. कोल्हापुर यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
vishal dashrath mule
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): psi
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
शाहुपुरी पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): santosh gundopant
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): SGDM7903